क्रमांक:१०१/आस्था/पोशि ते असई/स.सा.ब.-२०१८/ १०० /२०१८ धुळे, दिनांक -२७.०४.२०१८.

संदर्भ :-१)महाराष्ट्र शासन,गृह विभाग,शा.नि.क्र.टिआरएन-०४०७/प्र.क्र.४५७/पोल-५ब,दि.१७.०५.२००७.
२)महाराष्ट्र शासन,गृह विभाग,शा.नि.क्र.टिआरएन-०११०/प्र.क्र.४८८/पोल-५ब, दि.२३.०४.२०१०.
३) सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ दिनांक १/२/२०१४
४) मा.पोलीस महासंचालक,म.रा.मुंबई यांचेकडिल परिपत्रक क्र.पोमसं/३/१०/६/गुशा-विशा/नेमणुक/४०८/२०१४ दिनांक १६/१०/२०१४.
५) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग,शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-२०१४/व्हीआयपी २८४/प्र.क्र.३६२/१२, दिनांक २६/११/२०१४.
६) महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग,शा.नि.क्र.एसआरव्ही-२०१४/मुस-३४/प्र.क्र.३७९/१२, दि.११.०२.२०१५.
७) सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ दिनांक १६/२/२०१५
८) मा.पोलीस महासंचालक,म.रा.मुंबई यांचेकडिल क्रमांक पोमसं/३/अधिसुचना/१४/७३/२०१४, दिनांक २५/२/२०१५.
९)महाराष्ट्र शासन राजपत्र असाधरण भाग चार असाधारण क्र.१५ दि.०६.०४.२०१५.
१०) महाराष्ट्र शासन,गृह विभाग,शा.नि.क्र.न्यायाप्र-३११५/प्र.क्र.८८/पोल-३,दि.०१.०७.२०१५.

विषय :- **पोलीस कर्मचारी यांच्या सर्वसाधारण बदल्या-२०१८.**

---ooo---

परिपत्रक :-

वर नमुद संदर्भातील अध्यादेश व शासन निर्णयाप्रमाणे धुळे जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवरील पोलीस कर्मचा-यांच्या **सर्वसाधारण बदल्या-२०१८ मधिल बदल्या माहे एप्रील व मे-२०१८ मध्ये दिनांक- ३१.०५.२०१८ पुर्वी करावयाच्या आहेत** . त्यासाठी आपल्या पोलीस ठाणे/शाखेतील बदली पात्र पोलीस कर्मचारी यांचे नावांची यादी यासोबत प्रसिध्द करण्यात येत आहे. बदलीस पात्र असलेल्या पोलीस कर्मचारी यांचे विनंती अर्ज पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांनी एकत्रितपणे दिनांक- १५.०५.२०१८ पुर्वी या कार्यालयास सादर करावेत.

१) वरील संदर्भाधीन अध्यादेव व शासन निर्णयाप्रमाणे पोलीस कर्मचा-यांच्या सर्वसाधारण बदल्या माहे एप्रिल व मे मध्येच करणे आवश्यक असल्याने सदरचे परिपत्रक पारित करण्यापूर्वी बदली संदर्भात या कार्यालयात प्राप्त झालेले सर्व अर्ज दप्तरी दाखल/नस्ती बंद करण्यात येत आहेत. त्यामुळे खालील सुचनेप्रमाणे कर्मचा-यांनी बदली संदर्भात नव्याने विनंती अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

२) ज्या पोलीस कर्मचा-यांची सर्वसाधारण बदल्या-२०१३ च्या आदेशात बदली झालेली आहे, परंतु बदलीचे ठिकाणी जरी उशिरा हजर झालेले आहेत. अशा सर्व कर्मचा-यांना बदलीस पात्र समजून अशा कर्मचा-यांची बदली करावयाची असल्याने त्यांनी आपल्या पसंतीच्या ०३ पोलीस ठाण्यांची नावे नमुद करुन विनंती अर्ज एकत्रितपणे विहीत मुदतीत या कार्यालयात सादर करावीत.

३) ज्या पोलीस कर्मचा-यांना एकाच पोलीस ठाणेस /शाखेस दिनांक- ३१.०५.२०१८ रोजी पाच वर्षे किंवा पाच वर्षापेक्षा जास्त कालावधी होणार आहे /झालेला आहे. अशा पोलीस कर्मचारी यांचे ३ पसंतीचे ठिकाणे नमुद करुन विनंती अर्ज एकत्रित सादर करावेत.कर्मचा-याचे विनंती अर्ज वेगवेगळे सादर करु नयेत.

४) जिल्हयातील एकाच तालुक्यात ज्या पोलीस कर्मचा-यांची १२ वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त काळ सेवा झालेली आहे. अशा कर्मचारी यांनीही आपल्या पसंतीच्या ०३ पोलीस ठाण्यांची नावे नमुद करुन विनंती अर्ज एकत्रितपणे विहीत मुदतीत या कार्यायात सादर करावीत.

५) महाराष्ट्र शासन,गृह विभाग, शा.नि.क्र.टिआरएन-०४०७/प्र.क्र.-४५७/पोल-५ब, दि.१७.०५.२००७ मधील अनु.क्र.१ अन्वये पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक या संभार्गातील कोणत्याही कर्मचा-यांच्या त्यांच्या स्वग्राम असलेल्या तालुक्यात नेमणूक/बदली करण्यांत येऊ नये बाबत.मात्र सेवानिवृत्तीस ०३ वर्ष बाकी असल्यास व त्यांची विनंती असल्यास त्यांच्या स्वतःच्या तालुक्यात नेमणूक करण्यात यावी असे नमुद असल्याने ज्या पोलीस कर्मचारी यांची त्यांच्या स्वग्राम असलेल्या तालुक्यात नेमणूक आहे. अशा कर्मचारी यांनीही आपल्या पसंतीच्या ०३ पोलीस ठाण्यांची नावे नमुद करुन विनंती अर्ज एकत्रितपणे विहीत मुदतीत या कार्यालयात सादर करावीत.

६) ज्या पोलीस कर्मचा-यांना एका ठिकाणी दिनांक ३१/५/२०१८ रोजी दोन वर्षे किंवा २ वर्षापेक्षा कमी कालावधी झालेला आहे अशा पोलीस कर्मचा-यांचे विनंती अर्ज नस्तीबंद करण्यात येतील.

७) ज्या पोलीस कर्मचारी यांच्या कामकाजाबाबत पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी/ उप विभागीय पोलीस अधिकारी यांची तक्रार आहे अशा पोलीस कर्मचारी यांचे सविस्तर कारणमिमांशा नमुद करुन गोपनीय अर्धशासकीय पत्रान्वये रिपोर्ट सादर करावा.

८) तसेच वरील अधिनियमात दिलेल्या तरतुदीनुसार सध्याच्या नेमणुकीच्या ठिकाणाचा कालावधी पुर्ण केल्यानंतर बदलीसाठी पात्र झालेल्या कर्मचा-यांच्या सेवानिवृत्तीस एक वर्षापेक्षा कमी कालावधी शिल्लक आहे अशा कर्मचा-यांच्या बाबतीत उक्त अधिनियमातील तरतुदी नुसार पदावधी वाढविता येईल. याची पोलीस कर्मचारी यांनी नोंद घ्यावी.

९) सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी /शाखा प्रभारी अधिकारी धुळे जिल्हा यांनी आप-आपल्या पोलीस ठाणेस/शाखेस नेमणुकीस असलेल्या ज्या कर्मचा-यांना दिनांक ३१/५/२०१८ रोजी पाच वर्ष पुर्ण होत आहेत परंतू बदलीपात्र कर्मचा-यांच्या यादीत त्यांचे नांव नाही अशा कर्मचा-यांची नावे विनाविलंब या कार्यालयास कळवावे .बदली पात्र कर्मचा-याची बदली न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी पो.स्टे. प्रभारी अधिकारी/शाखा प्रमुख यांची राहील, याची नोंद घ्यावी.

**१०) दिनांक -१५.०५.२०१८ नंतर बदली संदर्भात आलेले सर्व अर्ज नस्तीबंद करण्यांत येतील याची नोंद घ्यावी.**

सर्व पोलीस ठाणे/शाखा प्रभारी अधिकारी यांनी आपआपल्या पो.स्टे./शाखेस नेमणुकीस असलेल्या वार्षिक सर्वसाधारण बदल्या-२०१८ साठी पात्र असलेल्या कर्मचा-यांची बिनचुक माहिती सादर करावी. यात भविष्यात न्यायालयीन बाब उद्भवल्यास त्याबाबत प्रभारी अधिकारी स्वतः गंभिर शिस्तभंग विषयक कारवाईस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

**( एम.रामकुमार)**
**पोलीस अधीक्षक धुळे.**

प्रति :- सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी धुळे जिल्हा.
पोनि.जिविशा/स्थागुशा/शवाशा/नि.कक्ष,धुळे/मानव संशाधन शाखा/वाचक शाखा/रापोनि.पो.मु.धुळे/ पोउनि.मोपवि.धुळे/पोउनि.श्वान पथक/बीडीडीएस.

प्रत :- उप विभागीय पोलीस अधिकारी धुळे शहर/साक्री/शिरपुर/पो.उप अधीक्षक (मु)धुळे

<u>प्रत सस्नेह:-</u>
अपर पोलीस अधीक्षक धुळे.